# सहायक अभियंता, श्रेणी-1
# सा. बां.उपविभाग क्र.4 ,पुणे-1
# यांचे कार्यालय

de.pwsubdiv4punr@gmail.com Phone : (020)-26061245

जा.क्र.सा.बां.उपवि-4/अशा/ 312 /2020 दिनांक-28 /07/2020

**प्रति,**

मा. उपवनसंरक्षक,
घोड प्रकल्प वनविभाग जुन्नर-410 502

**विषय :** वन (संवर्धन) अधिनियम,1980 अंतर्गत कलम 2 प्रमाणे सन 1980 पुर्वी अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या रुंदीकरणास परवानगी मिळणे बाबत. क्षेत्र 0.09 हे.सुधारित क्षेत्र 0.34 हेक्टर (नारायणगांव -ओझर- ओतूर रस्ता राज्य महामार्ग क्र.128. कि.मी. 55/0 ते कि.मी 73/400- लांबी 400 कि.मी.) पी.एन.35 जि. पुणे.) ***Proposal No.:-FP/MH/ROAD/45244/202.***

**संदर्भ:** 1.शासननिर्णय क्रमांक पिएलएन-2016/सीआर-(2511)/ नि-3 मंत्रालय, मुंबई दिनांक 1/12/2016.
2.महाराष्ट्र शासनाच्या वनविभागाकडील महापरिवेश या वेबसाईटवर दिनांक 30/03/2020 रोजी Online सादर Form-A-Part-I प्रपत्र.
3.या कार्यालयाडील पत्र क्र सा.बा उ-प-वी-/अशा/-218,दि. 16/06/2020.
4.आपले कार्यालयाकडील पत्र क्र ब/कक्ष-4.2/जमीन/29/2020,दिनांक 19/06/2020.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र.1 नुसार शासनाने पुणे जिल्हयातील **अष्टविनायक रस्त्यांची सुधारणा करणेसाठी हायब्रीड ॲन्यूटी (Hybrid -Annuity)** प्रकल्पांतर्गत रस्ते दुरुस्तीसाठी निर्णय पारित केलेला आहे. त्यामध्ये नारायणगांव -ओझर- ओतूर राज्य महामार्ग-128 या रस्त्याचा समावेश आहे. प्रकरणातील नारायणगांव -ओझर- ओतूर रस्ता वनविभागाच्या टोपोशिट क्र. 47-E-16 (Surveyed 1975-76, 1980-81) वर नमुद असुन सन 1980 पुर्वी अस्तित्वात असलेला रस्ता आहे. सदर रस्त्याची रुंदी 7 ते 7.5 मीटर आहे.

तथापी सदर रस्ता मौजे धालेवाडी तर्फे हवेली ता जुन्नर जि पुणे या गावाच्या वन कंपार्टमेंट 45 सर्व्हे नं.146 गट नं.136 व सर्व्हे नं.35 गट नं.147 रस्ता साखळी क्रमांक 61/250 ते 61/675 या लांबी मध्ये (425 मी. रस्ता रुंद करणे आवश्यक आहे. त्यानुसार संदर्भ क्र.3 अन्वये वन (संवर्धन) अधिनियम,1980 अंतर्गत 7 प्रतीतील प्रस्ताव आपले कार्यालयास सादर केलेला आहे. प्रकरणी संदर्भ क्र.4 अन्वये काही मुददे उपस्थित करुन पुर्तता करण्या बाबत या कार्यालयास कळविले आहे. त्यानुसार मुददे निहाय पुर्तता खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

| अ.क्र. | उपस्थित मुददा | करण्यात आलेली पुर्तता |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावात रस्त्याच्या दोन्ही बाजुस केवळ साईड पटटीसाठी दोनही बाजुस 1.5 मीटर प्रमाणे एकुण 3.00 मीटर रस्ता रंदीकरणासाठी प्रस्तावित केला आहे. तथापी रस्त्याची एकुण रुंदी स्पष्ट होत नाही. करीता रस्त्याचा काटछेद(Cross-Section) दर्शविणारा नकाशा प्रस्तावात जोडावा. | सदर प्रस्तावात नमुद रस्ता पुर्वीचा रस्ता असुन टोपोशिट क्र. 47-E-16 (Surveyed 1975-76, 1980-81) वर नमुद आहे. सदर रस्ता सन 1980 पुर्वी अस्तित्वात असलेला रस्ता आहे. सदर रस्त्याची रुंदी 7 ते 7.5 मीटर आहे. त्यामध्ये 3 मीटर रुंदीकरण करुन सदर रस्ता 10 मीटर रुंद करणे नियोजित आहे. तसेच साईड पटटया प्रत्येकी 1 मीटर प्रमाणे दोन्ही बाजु 2 मीटर तर गटर |

13/8/2020
आवक / जावक लिपिक
उप वनसंरक्षक कार्यालय
घोड प्रकल्प वनविभाग
तहसिल कार्यालयाजवळ
जुन्नर, जि. पुणे.४१०५०२

| | | |
|---|---|---|
| | | प्रत्येक बाजु 1.5 मीटर प्रमाणे दोन्ही बाजु 3 मीटर या प्रमाणे असुन एकुण वनक्षेत्रातील रुंदी साईड पटटया व गटरसह 15 मीटर आहे.त्यानुसार प्रस्तावात आवश्यक दुरुस्ती करण्यात आली असुन त्यानुसार काटछेद (Cross-Section) दर्शविणारा नकाशा प्रस्तावात जोडण्यात आला आहे. (7 **प्रती**) |
| 2 | प्रमाणपत्र क्र.19 मध्ये वृक्षतोडीची रक्कम भरण्यास तयार असले बाबतचे प्रमाणपत्र सादर करावे. | प्रकरणात वृक्षतोड प्रस्तावित नाही. तथापी वृक्षतोडीची रक्कम भरण्यास तयार असले बाबतचे प्रमाणपत्र क्र.19 सादर करण्यात आले आहे. (7 **प्रती**) |
| 3 | प्रमाणपत्र क्र.28 व 40 नुसार ग्रामसभेचा ठराव व नाहरकत प्रमाणपत्र प्रस्तावात जोडावे. | प्रस्तावात ग्रामसभेचा ठराव व नाहरकत प्रमाणपत्र जोडण्यात आले आहे. (7 **प्रती**) |
| 4 | प्रस्तावित रस्त्याने बाधित होणा-या वनक्षेत्राचा (Geo-refferanced) नकाशा प्रस्तावात जोडावा. | प्रस्तावित रस्त्याने बाधित होणा-या वनक्षेत्राचा (Geo-refferanced) नकाशा प्रस्तावात जोडण्यात आला आहे. (7 **प्रती**) |

प्रकरणी मौजे धालेवाडी तर्फे हवेली ता जुन्नर जि पुणे या गावाच्या वन कंपार्टमेंट 45 सर्व्हे नं.146 गट नं.136 व सर्व्हे नं.35 गट नं.147 मधुन जाणारा सदर रस्ता वनक्षेत्रात उंच ठिकाणावर, वळणावर असल्याने व पुढे तिव्र उतार असल्याने तसेच यामुळे पुढील वाहने येता-जाता दिसत नसल्याने प्रस्तावित ठिकाण आपघात प्रवण स्थळ झालेले आहे. यास्तव रस्ता रुंदीकरण करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर आहे. प्रस्तुत प्रस्ताव दुरुस्ती नुसार सदर रस्त्यासाठी एकुण 0.34 हेक्टर वनक्षेत्राची आवश्यकता आहे. त्यानुसार 7 प्रतीतील प्रस्ताव आवश्यक दुरुस्तीसह या सोबत सादर करण्यात आला आहे. तरी प्रकरणी शासनाकडील मंजूरीच्या अनुषंगाने आपणाकडील आवश्यक कार्यवाही होणेस विनंती आहे.

**सोबत**-वरील प्रमाणे (7 प्रती)

(श्री एस एस नगरारे)
सहायक अभियंता, श्रेणी-1
सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग, पुणे-1

**प्रतिलिपी** :- मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग पुणे, बी बरॅक, मध्यवर्ती इमारत परिसर, कॅम्प, पुणे-411001.यांना माहितीसाठी सादर.